

# महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ४, अंक १ जानेवारी २०२३ (क्र.१२)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३

संरक्षित क्षेत्रातील पर्यटन

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्प ४

उमरेड कऱ्हांडला प्रकल्पाच्या आतील रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणाचे काम तूर्तास बंद

कर्नाळा पक्षी अभयारण्य ४

कर्नाळा अभयारण्यात पक्षीगणनेत १३४ प्रजातींची नोंद

कास पठार राखीव वन ५

कास पठाराभोवतीचे कुंपण काढले

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ५

ताडोबा अंधारीतील सफारी बुकिंगबाबत चौकशीची विधानसभेत मागणी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात फुलपाखरांच्या १३४ प्रजातींची नोंद

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात एका आठवड्यात सात वाघांचा मृत्यू

ताडोबा अंधारी प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात जखमी वाघिणीचा दोन बछड्यांसह वावर

पेंच व्याघ्र प्रकल्प ७

पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघांवर लक्ष ठेवण्यासाठी ‘रेडिओ कॉलर’चा वापर

पेंचमध्ये वाघाच्या शिकारप्रकरणातील आरोपीकडून वन कर्मचाऱ्यांना मारहाण

बोर व्याघ्र प्रकल्प ८

बोर व्याघ्र प्रकल्पात पुन्हा एकदा अस्वलाची ‘ल्युसिस्टिक’ पिल्ले

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ८

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पर्यटक वाहनांची तपासणी; नियमांची पूर्तता न केलेल्या वाहनांच्या वापरावर बंदी

मेळघाटातील गावांचे पुनर्वसन प्रशासकीय इच्छाशक्तीअभावी लांबणीवर

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वनरक्षकांची पदे रिक्त

विषारी मांस खाल्ल्यामुळे मेळघाटात दोन बिबटे ठार

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ११

गुजरातेतील सिंह अखेर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात

गोरेवाडा बचाव केंद्रातील वाघांची जोडी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात

**राज्यस्तरीय बातम्या** ११

समृद्धी महामार्गावर वन्य प्राण्यांचे अपघात सुरूच; उपाययोजनांच्या परिणामकारतेबाबत शंका

राज्यात ११ जिल्ह्यांमध्ये वन्य प्राण्यांवर उपचारासाठी केंद्रे

राज्यात वन विभागात २५९ पदे रिक्त

माथेरान पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र १३

माथेरानच्या टेकडीखालून बोगदा खणण्यास केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी

कोकण/पश्चिम महाराष्ट्र १४

सह्याद्रीच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रातून ३८८ गावे वगळण्याचा राज्य सरकारचा निर्णय

पश्चिम महाराष्ट्र १४

कराड तालुक्यात ऊसाच्या शेतात आढळली दुर्मीळ 'रस्टी स्पॉटेड कॅट'ची पिल्ले

जुन्नर इथे बिबट्या सफारी सुरू होण्याआधीच जाहिराती

विदर्भ १५

छत्तीसगडमधून विदर्भात आलेले हत्ती परतीच्या मार्गावर

टी-६ वाघिणीला जेरबंद करण्यासाठी वन विभाग पुन्हा सक्रीय; हल्ल्यांतील मृतांची संख्या १०

अकोला जिल्ह्यात माकडांच्या त्रासावर बेकायदा उपाययोजना; वन विभागाकडून चौकशी

गोरेवाडा इथून वाघबिबटे जामनगरला रवाना

विदर्भातील सारस क्रौंच पक्ष्यांची नेमकी संख्या अज्ञात

माळढोक पक्ष्याचे चंद्रपुरात दर्शन

माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त १९

माणूस-वाघ संक्षिप्त वृत्त २०

**राष्ट्रीय बातम्या** २०

देशातील प्रत्येक पाचपैकी दोन पाणथळ जागा नष्ट; स्वयंसेवी संस्थेचे निरीक्षण

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २१

जैवविविधता असलेल्या जमिनीच्या संरक्षणाचे लक्ष्य गाठण्यात आशियाई देश अपयशी

**मृत्यूलेख** २२

पर्यावरण रक्षणासाठी व्यवस्थेशी संघर्ष करणारी कुसुम!

**थोडक्यात पण महत्त्वाचे...** २४

समृद्धी महामार्गाच्या निमित्ताने





**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड ४, अंक १, जानेवारी २०२३ (क्र. १२)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ता**:C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेल**:marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळ**:https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/

***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***

## संपादकीय

### संरक्षित क्षेत्रातील पर्यटन

येत्या काळात संरक्षित क्षेत्रात संवेदनशील पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळ्यांवर मार्गदर्शक सूचना, नियमावली, कृती आराखडे इ. तयार केले जात आहेत. संरक्षित क्षेत्रातील पर्यटनाच्या समर्थनार्थ मांडले जाणारे काही मुद्दे असे आहेत - वन्य अधिवासांचा ऱ्हास टाळून उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याची क्षमता पर्यटन व्यवसायात आहे, या पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगाराचे नवे पर्याय उपलब्ध होतात, त्यांचे अन्यत्र स्थलांतर होण्याचे प्रमाण घटते, स्थानिक जनतेच्या आर्थिक, सामाजिक स्तरांत वाढ होते, स्थानिक उत्पादनांचा व्यवसाय करणे वा व्यवसाय असल्यास त्यात वाढ शक्य होते, आपल्या देशाप्रदेशातील नैसर्गिक वारसा प्रत्यक्ष पाहता येतो, त्यातून त्याविषयी जनजागरूकता, तो राखण्याबाबत संवेदनशीलता निर्माण करण्यास वाव मिळतो इ.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अंकात संरक्षित क्षेत्रातील आणि वन्य अधिवासातील पर्यटनाविषयीचे वृत्तांकन लक्ष वेधून घेते. सातारा जिल्ह्यातील कास पठारावर दशकभरापूर्वी घातलेले कुंपण अखेर काढण्यात आले आहे. पठारावर होणारी चराई ही इथल्या जैवविविधतेला पोषक ठरत असल्याचा तज्ज्ञांनी दिलेला निर्वाळा आणि १० वर्षांच्या अनुभवानंतर अखेर जिल्हा प्रशासन व वन विभागाने ही कार्यवाही केली. पठारावरील जैवविविधतेचा पर्यटकांच्या वावरामुळे ऱ्हास होऊ नये यासाठी पर्यटन काळात तात्पुरती जाळी बसवण्याचे जिल्हा प्रशासनाने ठरवले आहे. पर्यटनामुळे अधिवासाचा ऱ्हास होतो हे यातून सूचित होते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पर्यटनासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांबाबत आवश्यक नियम पाळले जात नसल्यामुळे त्यांच्या वापरावर वन विभागाने बंदी घातली आहे. हे वृत्त दिलासादायक आहे पण त्याचवेळी अशा असुरक्षित वाहनांमधून व्याघ्र अधिवासात पर्यटकांना फिरवले जाते ही बाबच मुळात चिंताजनक आहे. राज्यातील किंवा देशातील अन्य व्याघ्र प्रकल्पांमध्ये पर्यटकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात आली आहे का? खुद्द पर्यटकांना याविषयी जाणीव आहे का? असे प्रश्न उपस्थित करणारे हे वृत्त आहे.

ताडोबातील पर्यटनातून मिळणाऱ्या महसुलाच्या वापराचा मुद्दा राज्याच्या विधानसभेत मांडण्यात आला. किंबहुना, त्यामध्ये घोटाळा असल्याचे सभागृहात एका सदस्याने राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले. पर्यटनातून व्याघ्र प्रकल्पाला मिळणाऱ्या पैशाचा प्रकल्पाच्या देखभालीसाठी पुरेशा योग्य प्रकारे वापर केला जात नसावा, ही जाणीव अस्वस्थ करणारी आहे. मात्र, हा विषय मुद्रित माध्यमांमध्ये फारसा चर्चेत दिसत नसताना या बाबीची विधानसभेत दखल घेतली गेली. हे वृत्त प्रकाशित झाल्यामुळे या प्रकाराला थेट सरकारदरबारी वाचा फुटली हे महत्त्वाचे आहे.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात बिबट्या सफारी सुरू करण्याचा वन विभागाचा मानस आहे. अशा सफारीमुळे स्थानिकांना अर्थार्जनाच्या नव्या संधी उपलब्ध होतील. त्यातून बिबट्याविषयक समाजमनात गेल्या काही वर्षांत निर्माण झालेली नकारात्मकता कमी करण्यास मदत होईल, अशी शक्यता निर्माण झाली आहे. परंतु, बिबट्या सफारीला सुरुवात होण्यापूर्वीच त्याबाबत जाहिराती करणाऱ्यांना समज देण्याची वेळ वन विभागावर यावी, ही घटना आपल्या समाजात वन्य अधिवासातील पर्यटनविषयक गांभीर्याचा अभाव दर्शवणारी आहे.

संरक्षित क्षेत्रातील पर्यटनाच्या समर्थनार्थ मांडलेल्या मुद्द्यांमध्ये तथ्य आहे की नाही, ही बाब अलाहिदा. संरक्षित क्षेत्र निर्मितीमागील मुख्य उद्देश हा वन्य जीवसृष्टीला मानवी व्यवहारांपासून संपूर्ण संरक्षण देण्याचा आहे. मात्र, प्रस्तुत अंकातील वृत्तांकनाचे नमुने पाहता जाणवलेली महत्त्वाची बाब म्हणजे संरक्षित क्षेत्रात पर्यटन असावे की असू नये हा मूलभूत प्रश्न माणसांनी


स्वतःला सोयीस्कररित्या सोडवून टाकला आहे!

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्प

**उमरेड कऱ्हांडला प्रकल्पाच्या आतील रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणाचे काम तूर्तास बंद**



इतवारी (नागपूर) ते नागभीड रेल्वेमार्गाच्या उमरेड कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या टप्प्यात रुंदीकरणाच्या कामाला वन विभागाने आक्षेप नोंदवल्यामुळे हे काम दोन वर्षांपासून ठप्प आहे.

ब्रिटिशकालीन इतवारी ते नागभीड नॅरोगेज रेल्वेमार्गाचे रूपांतर ब्रॉडगेजमध्ये केले जात आहे. रेल्वे मंत्रालय आणि राज्य सरकारच्या संयुक्त सहभागातून हा प्रकल्प होत असून प्रकल्पाचे काम 'महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.' (महारेल) करत आहे. राज्य सरकार आणि रेल्वे मंत्रालय खर्चाचा प्रत्येकी ५०% वाटा उचलणार आहे. या रेल्वेमार्गाचा फायदा कोराडी, खापरखेडा, मौदा व तिरोडा इथल्या औष्णिक प्रकल्पांना होईल, असे वृत्तात नमूद केले आहे.

हा १०६ किमीचा नॅरोगेज रेल्वेमार्ग २४ नोव्हेंबर २०१९ ला वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यानंतर २० महिन्यांत रुंदीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. पण तीन वर्षांनंतर केवळ ४५% काम झाले आहे. त्यामुळे या प्रकल्पाची मूळ अंदाजित किंमत १४०० कोटींहून वाढून १७०० कोटींवर जाण्याची शक्यता आहे. यातील १०० कोटी रुपये वन्यजीव उपशमन योजनांवर खर्च केले जाणार आहेत. या उपायोजनांसंदर्भातील अंतिम आराखडा 'महारेल'ने प्रधान मुख्य वन संरक्षक कार्यालयाला सादर केला आहे. त्याला मान्यता मिळेल आणि हा प्रकल्प डिसेंबर २०२३ मध्ये पूर्ण होईल, असे 'महारेल'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**स्रोत -** राजेश्वर ठाकरे. 'नागपूर-नागभीड रेल्वे प्रकल्पाचा खर्च १७०० कोटींवर; वन्यजीव भ्रमणमार्गामुळे काम ठप्प', *www.loksatta.com*, १०.१२.२०२२.

### कर्नाळा पक्षी अभयारण्य

**कर्नाळा अभयारण्यात पक्षीगणनेत १३४ प्रजातींची नोंद**



रायगड जिल्ह्यातील पनवेल शहराजवळ असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात डिसेंबर महिन्यात झालेल्या पक्षीगणनेत १३९ प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये 'पेंटेड स्परफाऊल' हा पक्षी प्रथमच कर्नाळ्यात दिसून आला आहे.

अभयारण्यातील अधिवासाचा अभ्यास वन विभाग करत असून त्याला जोड देण्यासाठी 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट' या संस्थेने २३ ते २५ डिसेंबर या काळात हे सर्वेक्षण केले. वन विभागाच्या १० कर्मचाऱ्यांसह संस्थेचे १४ स्वयंसेवक आणि महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, कर्नाटक आणि छत्तीसगडमधील २६ उत्साही पक्षीनिरीक्षक या सर्वेक्षणात सहभागी झाले होते.

पक्ष्यांच्या १३९ प्रजातींमध्ये उल्लेखनीय अशा सनबर्ड पक्ष्याच्या पाच प्रजाती, फ्लायकॅचर पक्ष्याच्या नऊ, घुबडाच्या सहा प्रजाती, शिकारी पक्ष्यांच्या नऊ, सुतारपक्ष्याच्या चार आणि वॉब्लर पक्ष्याच्या सहा प्रजातींसह 'पेंटेड स्परफाऊल' या प्रजातीची नोंद करण्यात आली आहे. त्याखेरीज, सस्तन प्राण्यांच्या १० प्रजाती, सरीसृप व उभयचर प्राण्यांच्या २४ प्रजाती, कीटकांच्या

५२ आणि कोळयांच्या २८ प्रजाती कर्नाळयाच्या जंगलात दिसून आल्या आहेत.

**स्रोत** – उमेश के. परिदा. '139 avian species spotted during bird count at Maharashtra's Karnala sanctuary', *timesofindia.indiatimes.com*, ०२.०१.२०२३.

## कास पठार राखीव वन

### कास पठाराभोवतीचे कुंपण काढले

कास पठारावर चराईबंदीसाठी घातलेले कुंपण काढण्याच्या कामाला जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी व उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांनी कास समिती आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन एक डिसेंबर रोजी सकाळी सुरुवात केली.


कास पठाराचे संरक्षण व्हावे या हेतूने दशकभरापूर्वी कास समिती व वन विभाग यांच्या पुढाकारातून हे कुंपण घातले होते. मात्र, कुंपण घातल्यावर पठारावर गुरे चारणे बंद झाले. त्यामुळे गवताचे प्रमाण वाढले, प्राण्यांच्या संचारादरम्यान त्यांच्या मलमूत्र विसर्जनातून मिळणारे खत बंद झाले. परिणामी, फुलांची संख्या दिवसेंदिवस घटू लागली. कुंपणामुळे कास पठारावरील जैवविविधता धोक्यात आल्याचे तज्ञ या काळात वेळोवेळी सांगत होते.

जयवंशी यांनी जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून कास पठाराचे संवर्धन व इथे पर्यटन वाढण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली. कास पठार संवर्धनासाठी वन विभागाने वन भवन सातारा इथे तज्ञांची बैठक घेऊन कासच्या संवर्धनासाठी अभिप्राय घेतले. त्यात कास पठारावरील कुंपण काढलेच पाहिजे असा एकंदरीत सूर होता.

कुंपण काढल्यानंतर कास पठारावर असामाजिक तत्त्वांचा वावर वाढू नये यासाठी समितीमार्फत जास्त राखणदार ठेवण्यात येतील. कुंपण काढल्यामुळे वन्य प्राण्यांसाठी हा परिसर मोकळा होईल.

पुढील हंगाम पूर्वीप्रमाणे चांगला होण्यासाठी या मोहिमेचा फायदा होईल. हंगामाच्या सुरुवातीला पर्यटनास सुरुवात झाल्यावर फुलांचे व पठाराचे संरक्षण करण्याकरिता तात्पुरती जाळी बसवण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

**स्रोत** - सूर्यकांत पवार. 'कासच्या कुंपणावर सर्जिकल स्ट्राईक; जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कुंपणावर हातोडा', *www.esakal.com*, ०१.१२.२०२२.



## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### ताडोबा अंधारीतील सफारी बुकिंगबाबत चौकशीची विधानसभेत मागणी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या सफारी बुकिंगबाबत संपूर्ण चौकशी व्हावी, अशी मागणी विधानसभेत करण्यात आली. सफारी बुकिंगमध्ये घोटाळा होत असल्याचा आरोप भद्रावती-वरोरा विधानसभा क्षेत्राच्या काँग्रेस आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केला.

आमदार धानोरकर यांनी विधानसभेत झालेल्या चर्चेत ताडोबा व्यवस्थापनाच्या एकूणच कामाच्या पद्धतीवर टीका केली. या व्याघ्र प्रकल्पाच्या महसुलातील ३०% महसूल राज्य सरकारला मिळतो. व्याघ्र प्रकल्पाच्या विकासासाठी या निधीचा वापर कशा प्रकारे करण्यात आला या माहितीसह अधिकाऱ्यांना पत्राद्वारे विचारलेल्या अन्य प्रश्नांची उत्तरे देण्यात टाळाटाळ होत आहे, असे त्या

म्हणाल्या.

**स्रोत** - 'चंद्रपूर: 'ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील सफारी बुकिंगमध्ये मोठा घोळ'; चौकशीची मागणी', *www.loksatta.com*, ३१.१२.२०२२.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात फुलपाखरांच्या १३४ प्रजातींची नोंद


ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात झालेल्या १० वर्षांच्या अभ्यासात सहा कुळातील फुलपाखरांच्या १३४ प्रजातींची नोंद झाली आहे. या विषयीचा शोधनिबंध आंतरराष्ट्रीय विज्ञान पत्रिका 'जर्नल ऑफ इन्सेक्ट बायोडायव्हर्सिटी अँड सिस्टेमॅटिक्स'मध्ये प्रकाशित झाला आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वर्ष २००८ ते २०१० या काळात पहिले सर्वेक्षण सेलू इथल्या 'डॉ. आर. जी. भोयर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया'तील प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आशीष टिपले यांनी केले. त्यात त्यांनी फुलपाखरांच्या १११ प्रजातींची नोंद केली होती. त्यानंतर २०११ ते २०२१ या काळात टिपले यांच्यासोबत विभागीय वनाधिकारी शतानिक भागवत यांनी अभ्यास केला.

अभ्यासात आढळलेल्या एकूण ६० प्रजाती सहज आढळणाऱ्या, ३४ प्रजाती सामान्य, नऊ वारंवार आढळणाऱ्या, १९ दुर्मीळ आणि १२ अत्यंत दुर्मीळ आहेत. 'निम्फॅलिडे' कुळातील ४३ प्रजाती या अभ्यासात आढळल्या असून त्यापैकी चार प्रजातींची ताडोबात पहिल्यांदाच नोंद झाली आहे. 'पायरिडी' कुळातील १९ पैकी तीन प्रजाती पहिल्यांदाच नोंदवल्या गेल्या आहेत. 'हिस्पिरिडी' कुळातील २० प्रजातींपैकी सहा प्रजाती पहिल्यांदा नोंदवल्या गेल्या आहेत. 'पॅपिलिओनिडी' कुळातील १० पैकी दोन प्रजाती नवीन आढळल्या आहेत.

हे सर्वेक्षण तलाव, नद्या आणि आसपासच्या भागांजवळ करण्यात आले. बागा, वृक्षारोपण केलेली ठिकाणे आणि कुरणे अशा माणसांचा वावर जास्त असलेल्या ठिकाणी फुलपाखरे कमी आढळली. पावसाळ्यापासून हिवाळ्याच्या सुरुवातीपर्यंत फुलपाखरे जास्त प्रमाणात आढळली. त्यानंतर उन्हाळ्याच्या सुरुवातीला त्यात घट झाली. खाद्य वनस्पतींची अनुपलब्धता आणि पाण्याची कमतरता हे यामागील कारण असू शकते, असे शोधनिबंधात म्हटले आहे.

निरोगी व उत्तम अनुवंशिक वैविध्य असणाऱ्या फुलपाखरांच्या प्रजाती टिकून राहण्यासाठी विदेशी खाद्य वनस्पतींऐवजी विविध प्रथिने आणि क्षारांचे स्रोत असणाऱ्या देशी वनस्पतीची लागवड करावी, हे शोधनिबंधात सुचवले आहे.



**स्रोत** - 'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात फुलपाखरांच्या १३४ प्रजाती; दहा वर्षांचा अभ्यासानंतर शोधनिबंध प्रकाशित', *www.loksatta.com*, ०३.०१.२०२३.
निशांत वानखेडे. 'ताडोबात वाघांसोबत फुलपाखरांचेही घ्या दर्शन! सात नव्यांसह १३४ प्रजातींची नोंद', www.lokmat.com, ०३.०१.२०२३.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात एका आठवड्यात सात वाघांचा मृत्यू

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला एका आठवड्यात सात वाघांचा मृत्यू झाला. ब्रह्मपुरी वन विभागातील नागभीड वन परिक्षेत्रात चिंधीचक जंगलात ७ डिसेंबर रोजी एका नर वाघाचा मृतदेह आढळला. त्यावरील खाणाखुणा पाहता हा मृत्यू दोन वाघांच्या झुंजीत झाल्याचा प्राथमिक अंदाज वनाधिकाऱ्यांनी वर्तवला. या घटनेपूर्वी त्याच आठवड्यात व्याघ्र मृत्यूच्या सहा घटना बफर क्षेत्रात उघडकीस आल्या होत्या. त्यात या सातव्या घटनेची भर पडली.

दरम्यान, अन्य सहा घटनांविषयी माहिती

वृत्तांकनात उपलब्ध झाली नाही.

**स्रोत** – 'वाघांचे मृत्यूसत्र थांबेना, सात दिवसांत सात वाघ संपले', *www.lokmat.com*, ०८.१२.२०२२.

**ताडोबा अंधारी प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात जखमी वाघिणीचा दोन बछड्यांसह वावर**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील पांगडी परिसरात एका जखमी वाघिणीचा वावर असल्याचे दिसून आले आहे. पर्यटकांनी या वाघिणीला दोन बछड्यांसह पाहिल्याचे सांगितले.

पायाला दुखापत झाल्यामुळे या वाघिणीची चपळाई कमी झाली आहे. त्यामुळे वेळीच उपचार झाले नाहीत तर ती शिकार मिळवण्याकरता लोकवस्तीतील पाळीव जनावरांकडे वळेल. त्यातून माणूस वाघ संघर्षाचे प्रसंग उद्भवतील, अशी भीती जाणकारांनी व्यक्त केली आहे.

व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालकांनी पांगडी परिसरातील वाघीण जखमी असल्याच्या माहितीला दुजोरा दिला आहे. तसेच, खबरदारीचा उपाय म्हणून या जखमी वाघिणीवर प्रकल्प प्रशासन लक्ष ठेवून आहे, असे सांगितले.

**स्रोत** – संजय रानडे. 'ताडोबात फिरतेय दोन पिल्लांसह जखमी वाघीण, वनाधिकाऱ्यांचे वेधले लक्ष', *www.lokmat.com*, २८.११.२०२२.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

**पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघांवर लक्ष ठेवण्यासाठी 'रेडिओ कॉलर'चा वापर**

पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघांवर लक्ष ठेवण्यासाठी रेडिओ कॉलरच्या आधारे 'टायगर मॉनिटरिंग रजिस्टर'मध्ये नोंदी केल्या जात आहेत. वाघ कुठून आला, त्याचा भ्रमणमार्ग कोणता, त्याच्या वागणुकीसह इतरही माहितीची नोंद या नवीन प्रयोगामुळे होत आहे. प्रकल्पातील ४४ वाघांचा या प्रयोगात समावेश आहे.

क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी हे काम नियमित करावे, अशा सूचना क्षेत्र संचालक आणि उपसंचालकांनी वन कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. जानेवारी २०२२ पासून प्रकल्पातील ७४ कक्षांमध्ये हा प्रयोग राबवण्यात येत आहे. वाघांच्या भ्रमंतीवर लक्ष ठेवणे शक्य झाल्यामुळे माणूस व वाघ यांच्या अचानक सामोरे येण्याने होणाऱ्या दुर्घटना रोखण्यास या प्रयोगाची मदत होईल, असे वनाधिकाऱ्यांचे मत आहे.

दरम्यान, प्रकल्पाच्या नागलवाडी वन परिक्षेत्रात वाघाची शिकार झाल्याचे नोव्हेंबरअखेरीस उघड झाले. या प्रकरणी तीन संशयितांना वन विभागाने ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. अधिक तपासासाठी वाघाच्या अवयवांच्या नमुन्यांची फॉरेन्सिक चाचणी केली जाणार आहे.



**स्रोत** - राजेश रामपूरकर. 'पेंचमधील वाघांचा मागोवा घेतेय 'टीएमआर'', *www.esakal.com*, ०७.१२.२०२२.
'पेंच व्याघ्र प्रकल्पात वाघाची शिकार', *www.esakal.com*, ३०.११.२०२२.


**पेंचमध्ये वाघाच्या शिकारप्रकरणातील आरोपीकडून वन कर्मचाऱ्यांना मारहाण**

पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघाची शिकार केल्याप्रकरणी पकडण्यात आलेल्या एका आरोपीने वन कोठडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पवनी वन परिक्षेत्र कार्यालयात ही घटना घडली. पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीने वन कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की व मारहाण केली. देवलापार पोलिस ठाण्यात या घटनेची तक्रार नोंदवण्यात आली आहे.

विद्युत प्रवाहाचा वापर करून वाघाची शिकार केल्याचा आरोप असलेल्या चौघांना वन विभागाने अटक

केली. त्यांच्यापैकी एकाकडून वाघाचे अवयव व शिकारीसाठी वापरलेले साहित्य जप्त करण्यात आले. या आरोपींना रामटेक प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांनी १८ जानेवारीपर्यंत वन कोठडी दिली होती. मात्र, पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी पुन्हा न्यायालयासमोर उभे केले व न्यायालयाने त्याला १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली.

**स्रोत** – 'कोठडीतून पळणारा शिकारी जाळ्यात; वनाधिकाऱ्यांवरही केला हल्ला', *maharashtratimes.com*, १७.०१.२०२३.



बोर व्याघ्र प्रकल्प

### बोर व्याघ्र प्रकल्पात पुन्हा एकदा अस्वलाची 'ल्युसिस्टिक' पिल्ले

बोर व्याघ्र प्रकल्पात अस्वलाची साधारण एक वर्ष वयाची दोन 'ल्युसिस्टिक' पिल्ले त्यांच्या आईसोबत दिसून आली. 'ल्युसिझम्'मध्ये रंगद्रव्याच्या अंशतः अभावामुळे प्राण्यांच्या शरीरावरील केसांचा रंग भुरकट होतो.

मादीसह असे पिल्लू दिसून येण्याची बोर प्रकल्पातील ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी वर्ष २०२० मध्ये एक मादी अस्वल एका काळ्या व एका ल्युसिस्टिक पिल्लासोबत आढळून आली होती.

बोर व्याघ्र प्रकल्पातील वनरक्षकाला १९ डिसेंबर रोजी आमगाव तपासणी नाक्याजवळ वन क्षेत्रातून निघून डांबरी रस्त्यावर येणारे एक अस्वल दिसले. त्यापाठोपाठ पुन्हा दोन ल्युसिस्टिक पिल्ले येताना दिसली. हा क्षण वनरक्षकाने कॅमेऱ्यात टिपला.

यापूर्वी १३ मार्च २०२० ला एका मादी अस्वलाच्या पाठीवर बसून एक काळ्या रंगाचे व एक ल्युसिस्टिक पिल्लू एका पर्यटकाला जंगल सफारीदरम्यान दिसले होते. तसेच २०२० मध्ये चौथ्या टप्प्यातील वन्य प्राणीगणनेदरम्यान बोर व्याघ्र प्रकल्पात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात २४ मार्च रोजी एक मादी अस्वल एक काळे व एक ल्युसिस्टिक अशा सुमारे तीन ते चार महिने वयाच्या दोन पिल्लांना पाठीवर बसवून भ्रमंती करतानाचे छायाचित्र टिपले गेले होते.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड १ अंक २*)

**स्रोत** – 'बोर व्याघ्र प्रकल्पात अस्वलांची दोन दुर्मीळ 'ल्युसिस्टिक' पिल्ले', *www.loksatta.com*, २१.१२.२०२२.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पर्यटक वाहनांची तपासणी; नियमांची पूर्तता न केलेल्या वाहनांच्या वापरावर बंदी

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ११ पर्यटक वाहनांनी नियमांची पूर्तता केली नसल्याचे तपासणीत आढळल्यामुळे या वाहनांच्या सफारीसाठी वापरावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच, अन्य २३ वाहनांना प्रादेशिक परिवहन विभागाने नियमांची पूर्तता न केल्यास बंदी घालण्याचा इशारा दिला आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पर्यटक वाहनाचा अपघात व वाहन बंद पडल्याचा अनुभव पर्यटकांना आला. एकाच वर्षात प्रकल्पात दोन वेळा पर्यटक वाहनांचे अपघात घडूनही या घटनेची दखल व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने घेतली नव्हती. जैवविविधता समितीचे सदस्य असलेल्या पर्यटकांनी याबाबत तक्रार केली. त्यानंतर मेळघाटातील चिखलदरा वन परिक्षेत्र अधिकाऱ्याने प्रादेशिक परिवहन विभागाला पत्र देऊन पर्यटक वाहनांची तपासणी करण्याची मागणी केली.

तक्रार केल्याला एक-दीड महिना उलटल्यावर वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीनंतर प्रादेशिक परिवहन विभागाने अहवाल दिला.

परिवहन विभागाने ३८ पर्यटक वाहनांची तपासणी केली. इतर काही वाहने तपासणीसाठी आली नाहीत. नियमानुसार प्रत्येक वाहनाची कायदेशीर कागदपत्रे, वाहनचालकाकडे परवाना, तसेच वाहनाचा व्यावसायिक परवाना आवश्यक आहे. तपासलेल्या ३८ पैकी एकाही वाहनधारकाकडे आवश्यक कागदपत्रे नव्हती. एक वाहन मध्य प्रदेशातील असून त्याची अजूनही महाराष्ट्रात नोंदणी करण्यात आली नव्हती. दोन वाहने चंद्रपूरच्या पोलीस अधीक्षकांच्या नावे व एक वाहन गडचिरोलीच्या पोलीस अधीक्षकांच्या नावे असल्याचे आढळले तर; १२ वाहने कालबाह्य झाल्याचे उघड झाले. कालबाह्य झालेल्या वाहनांना हरीत कर लागू होतो, पण या १२ वाहनांचा कर भरलेला नव्हता. चार वाहनांचा विमा नव्हता तर; चार वाहने चालवण्याच्या स्थितीतच नव्हती. अकरा वाहनांचे दस्तऐवज योग्य नसून ती वाहने तांत्रिकदृष्ट्याही योग्य नाहीत.

त्यामुळे या वाहनांचा पर्यटनासाठी वापर बंद करण्यात आला आहे. प्रादेशिक परिवहन विभागाकडून कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी, वाहनांच्या तंदुरुस्ती प्रमाणपत्रासह आवश्यक माहिती १० जानेवारी २०२३ पर्यंत चिखलदरा वन परिक्षेत्र कार्यालयाला सादर करावी. त्यानंतरच पर्यटनासाठी या वाहनांच्या वापराला परवानगी देण्यात येईल, असे वन विभागाने म्हटले आहे.

तपासणीचा अहवाल परिवहन विभागाने दिल्यानंतरही त्यावर कारवाई झाली नव्हती. या बाबीला बातमीद्वारे प्रसिद्धी दिल्यानंतर सफारीसाठी असणारी सर्व वाहने परिवहनेतर संवर्गातील असून जंगल सफारीसाठी त्याचा व्यावसायिक वापर होत असल्याने ६ जानेवारी २०२३ पर्यंत ती परिवहन संवर्गात करावी, अन्यथा सफारीसाठी त्यांच्या वापरावर बंदी घातली जाईल, असा इशारा चिखलदरा वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयाने वाहनमालकांना दिला आहे. अंक छपाईस जाईपर्यंत याविषयीचे पुढील वृत्त उपलब्ध झाले नाही.

कालबाह्य झालेल्या, कागदपत्रे नसलेल्या वाहनांतून पर्यटकांना सफारी घडवली जात आहे. अशी वाहने सफारीदरम्यान नादुरुस्त होण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी वन्य प्राण्याने हल्ला केल्याचा प्रसंग उद्भवल्यास पर्यटकांच्या सुरक्षेचे काय, हा प्रश्न आहे. त्याचबरोबर, व्याघ्र प्रकल्पातील जैवविविधता आणि वन्य जीवांनाही धोका पोहोचू शकतो. तसेच, पर्यटक वाहनात स्थानिक आदिवासींना रोजगारासाठी प्राधान्य देण्याऐवजी व्यावसायिकांकडे पर्यटन व्यवसाय आहे, या बाबींकडे वृत्ताने लक्ष वेधले आहे.

**स्रोत** – 'मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ११ पर्यटक वाहने सफारीसाठी बंद', *www.loksatta.com*, २६.१२.२०२२.
'व्याघ्र सफारीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांमुळे पर्यटकांचा जीव धोक्यात; परिवहन कार्यालयाच्या इशाऱ्यानंतरही वन खाते शांतच', *www.loksatta.com*, २४.१२.२०२२.

**मेळघाटातील गावांचे पुनर्वसन प्रशासकीय इच्छाशक्तीअभावी लांबणीवर**



मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या रखडलेल्या पुनर्वसनाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. पुनर्वसनाच्या रकमेत वाढ करण्याची मागणी या गावांनी केली आहे.

गेल्या २१ वर्षांत मेळघाटातील २२ गावांमधील सुमारे ४,२४८ कुटुंबांचे अन्यत्र पुनर्वसन करण्यात आले. व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय २० वर्षांपूर्वी घेण्यात आला. काही गावांचे पुनर्वसन पहिल्या टप्प्यात झाले आणि दप्तरदिरंगाईमुळे दुसऱ्या टप्प्यातील कामे रखडली, असे वृत्तात म्हटले आहे. या गावांना आणखी १५ वर्षांचा कालावधी पुनर्वसनासाठी

लागला तर, पुनर्वसनासाठी दिल्या जाणाऱ्या १० लाख रुपये कसे पुरेसे ठरतील, असा ग्रामस्थांचा प्रश्न आहे.

विस्थापित होणार असलेल्यांपैकी सर्वाधिक ६३४ कुटुंबे सेमाडोहमधील आहेत. रायपूरमध्ये ३९९, तर माखला गावात ३४८ कुटुंबे आहेत. काही गावकरी इच्छुक असले तरी प्रशासकीय इच्छाशक्तीअभावी हे काम लांबणीवर पडत असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

पुनर्वसनासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवला जातो. केंद्र सरकारच्या ६०% आणि राज्य सरकारच्या ४०% निधीतून पुनर्वसनाची कामे केली जातात. गेल्या वर्षी मालूर या गावाच्या पुनर्वसनासाठी ३० कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. केंद्र सरकारकडून वेळोवेळी निधी मिळत असतानाही पुनर्वसनाचे काम का पूर्ण होत नाही, असा जाणकारांचा प्रश्न आहे.

पुनर्वसनामुळे जंगलातील मोकळ्या झालेल्या गावठाण क्षेत्रात माणसांचा वावर व पाळीव गुरे चराईचा ताण कमी झाल्यामुळे वन्य प्राण्यांची संख्या वाढताना दिसत आहे. त्यामुळे उर्वरित गावांचे पुनर्वसन झाल्यास व्याघ्र संवर्धनाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे मत वन्यजीव संरक्षण क्षेत्रातील जाणकारांनी नोंदवले आहे.

**स्रोत** - मोहन अटाळकर. 'मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाचा तिढा कायम', *www.loksatta.com*, २१.१२.२०२२.



**मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वनरक्षकांची पदे रिक्त**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सहा वन्यजीव विभागांत वनरक्षकांची एकूण ४६० मंजूर पदे आहेत. गेल्या दोन वर्षांत अमरावती वन वृत्तात १५३ वनरक्षकांची वनपाल पदावर पदोन्नती झाल्याने मोठ्या संख्येने वनरक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे विशेष व्याघ्र संरक्षण दलातील वनरक्षक व वननिरीक्षक यांना अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. एकूण १०२ वनरक्षक व वननिरीक्षकांपैकी ७१ जणांना संवेदनशील नियतक्षेत्राचा कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच, संसाधनांचा अभाव, वन्य प्राण्यांची शिकार, अवयवांची तस्करी रोखण्याचे आव्हान आदी प्रश्न मेळघाट व्याघ्र प्रकल्पासमोर उभे आहेत.

**स्रोत** - मोहन अटाळकर. 'मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाचा तिढा कायम', *www.loksatta.com*, २१.१२.२०२२.

**विषारी मांस खाल्ल्यामुळे मेळघाटात दोन बिबटे ठार**



मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सिपना वन्यजीव विभागातील सेमाडोहच्या जंगलात झालेला दोन बिबट्यांचा मृत्यू विषप्रयोगाने झाल्याचे उघडकीस आले आहे.

सेमाडोह गावापासून एक किलोमीटर अंतरावर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात नर व मादी अशा दोन बिबट्यांचा एकाच वेळी मृत्यू झाला होता. या प्रकरणात वन विभागाच्या पथकाने सेमाडोह इथल्या ४० वर्षीय शेळीमालकाला अटक केली. या व्यक्तीच्या तीन शेळ्या बिबट्यांच्या हल्ल्यात ठार झाल्या होत्या. त्याचा सूड घेण्यासाठी त्याने विषप्रयोग करून बिबट्यांना ठार मारल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

शेळीमालकाने दोन मृत शेळ्यांवर उंदीर

मारण्याचे औषध घातले.  शेळ्या खाण्यासाठी आलेल्या बिबट्यांनी या शेळ्यांचे मांस खाल्याने दोन्ही बिबट्यांचा मृत्यू झाला.

**स्रोत** – ‘दुर्दैवी…‘त्या’ दोन बिबट्यांचा मृत्यू विष प्रयोगाने…तीन शेळ्या मारल्याने शेळीमालकाने घेतला सूड’, *www.loksatta.com*, १०.१२.२०२२.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### गुजरातेतील सिंह अखेर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात

गुजरातमधील सक्करबाग प्राणिसंग्रहालयातून सिंहांची जोडी मुंबईत आणली आहे. हे दोन्ही सिंह प्रत्येकी दोन वर्षे वयाचे आहेत. या जोडीला ६ डिसेंबर रोजी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सोडण्यात येणार आहे. ‘भारतीय स्टेट बँके’ने हे सिंह देखभालीसाठी दत्तक घेतले आहेत.

ही सिंहांची जोडी अवघ्या दोन वर्षांची असल्याने पुढील अनेक वर्षे सिंह सफारीचा आनंद पर्यटकांना घेता येईल. तसेच, सिंहांच्या पुढच्या पिढ्याही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात निर्माण होतील, असे राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक ४, खंड ३ अंक ३*)

**स्रोत** – ‘ठरलं! गुजरातच्या सिंहांचा महाराष्ट्रातील ‘या’ प्राणिसंग्रहालयात प्रवेश’, *www.loksatta.com*, ०६.१२.२०२२.

### गोरेवाडा बचाव केंद्रातील वाघांची जोडी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात

‘संजय गांधी राष्ट्रीय उद्याना’त नागपूर इथल्या गोरेवाडा बचाव केंद्रातून वाघवाघिणीची एक जोडी १२ जानेवारी रोजी स्थानांतरित करण्यात आली.  साधारण आठ वर्षे वयाचे हे दोन वाघ चंद्रपूर व ब्रह्मपुरी इथून जेरबंद करण्यात आले आहेत.


गुजरातकडून आशियाई सिंहांची जोडी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आणली गेली. त्या बदल्यात उद्यानातील वाघांची जोडी गुजरातला पाठवल्यानंतर त्यांच्या जागी ही जोडी उद्यानात आणल्याचे वृत्तात नमूद केले आहे. ही जोडी उद्यानातील व्याघ्र सफारीत ठेवण्यात आली आहे.

माणूस- वाघ संघर्षाच्या घटनांमुळे जेरबंद करण्यात आलेली ही वाघांची जोडी  राष्ट्रीय उद्यानात आणली आहे. मात्र, या दोन्ही वाघांचे आरोग्य उत्तम असून त्यांना कोणत्याही जखमा नाहीत. सफारीमध्ये ठेवल्यास उद्यानाचा महसूल वाढवण्यास मदत होईल व त्याचवेळी बचाव केंद्रात अन्य प्राण्यांसाठी जागा होईल, अशा विचाराने हा निर्णय घेतल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**स्रोत** – शेरी राज. ‘New pair of tigers arrive at Sanjay Gandhi National Park from Nagpur; adapt quickly’, www.freepressjournal.in, १२.०१.२०२३.

## राज्यस्तरीय बातम्या

### समृद्धी महामार्गावर वन्य प्राण्यांचे अपघात सुरूच; उपाययोजनांच्या परिणामकारकतेबाबत शंका



समृद्धी महामार्ग ओलांडणाऱ्या नीलगायींची चित्रफीत पाहून हा महामार्ग वन्य प्राण्यांसाठी सुरक्षित आहे का, ही बाब पुन्हा चर्चेत आली आहे.

रस्त्याचे बांधकाम सुरू होते तेव्हा या महामार्गावर काळविटे धावतानाची चित्रफीत समोर आली होती. आता महामार्गाचे उद्घाटन झाल्यावर निलगायींची चित्रफीत समोर आली आहे. तसेच, माकडासह इतर वन्य

प्राण्यांचे मृत्यू या महामार्गावर वाहनांच्या धडकेमुळे झाले आहेत. त्यात हिंगण्याजवळ ११ जानेवारी रोजी वाहनाच्या धडकेत १४ रानडुकरांच्या मृत्युची भर पडली आहे. या घटना पाहता महामार्गावर वन्य प्राण्यांसाठी केलेल्या उपशमन योजनांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

समृद्धी महामार्ग हा जंगलातून आणि जंगलालगत असलेल्या वन्य अधिवासातून गेला आहे. 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'(WII)तील संशोधकांच्या मदतीने या उपशमन योजना आखण्यात आल्या. त्यासाठी वन विभाग, स्वयंसेवी संस्था यांची संयुक्त समितीही स्थापन करण्यात आली होती. वन्य प्राण्यांचे संचारमार्ग ओळखून त्या त्या ठिकाणी भुयारी मार्ग व उड्डाणपूल तसेच वळणमार्ग तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, या जागांची ओळख चुकल्याची शंका सातत्याने होत असलेल्या अपघातांमुळे निर्माण झाल्याचे वृत्तात म्हटले आहे.

महामार्गाची संरक्षक भिंत अजून पूर्ण झालेली नाही. महामार्गाचे काम अपूर्ण असल्याने ती कामे करणाऱ्या वाहनांना आतबाहेर ये-जा करता यावी यासाठी अध्येमध्ये मोकळया जागा ठेवल्या आहेत. तसेच, अनेक ठिकाणी महामार्गाच्या दोन्ही बाजूने उंच कडे आहेत. त्यामुळे पाच फूट उंचीची संरक्षक भिंत तयार झाली तरीही कड्यांच्या आधारे वन्य प्राण्यांना ही भिंत ओलांडून आणि मोकळया जागांमधून आत शिरून हा महामार्ग ओलांडणे शक्य आहे.

महामार्गावर वाहतूक सुरू झाल्यापासून वन्य प्राण्यांचे गेलेले बळी आणि रस्ता ओलांडणाऱ्या वन्य प्राण्यांच्या घटना पाहता त्या त्या ठिकाणी वन विभाग वमहामार्ग प्राधिकरणाकडून देखरेखीची व्यवस्था होणे गरजेचे आहे. राज्य वन्यजीव मंडळाचे माजी सदस्यांनीही या समस्येच्या गांभीर्याकडे लक्ष वेधले आहे.

या खेरीज नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात समृद्धी महामार्गाच्या गोंदे ते सोनारी या टप्प्यात वाहनाच्या धडकेत एका तरसाचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. शिर्डी ते मुंबई या टप्प्याचे लोकार्पण झालेले नसताना ही घटना घडली. हा टप्पा औपचारिकरित्या सुरू होण्यापूर्वी वेगाने जाणाऱ्या वाहनाची धडक बसल्याने हा अपघात झाला.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २, खंड ३ अंक ३*)

**स्रोत** – 'समृद्धी महामार्ग ओलांडणाऱ्या नीलगायींची चित्रफित व्हायरल, हा रस्ता की?', *www.loksatta.com*, १४.०१.२०२३.
'वन्य प्राण्यांचा बळी घेण्यापासून "समृद्धी" काही थांबेना, एकाच दिवशी १४ रानडुकरांचा बळी', *www.loksatta.com*, १२.०१.२०२३.
शैलेश कर्पे. 'समृद्धी महामार्ग सुरू होण्याच्या आतच अज्ञात वाहनाच्या धडकेत तरस ठार', *www.lokmat.com,* १८.०१.२०२३.

## राज्यात ११ जिल्ह्यांमध्ये वन्य प्राण्यांवर उपचारासाठी केंद्रे

उपचारानंतर बरे झालेल्या वन्य प्राण्यांना नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यासाठी वन विभागाकडे व्यवस्था नव्हती. वर्ष २०१५ मध्ये वन विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी नागपुरात 'ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटर' (उपचारासाठी तात्पुरते केंद्र) तयार करण्यात आले. अवघ्या काही वर्षांतच या केंद्रातून वन्य प्राण्यांवर उपचार करून त्यांना नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्याचे प्रमाण वाढले. आता या धर्तीवर राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये केंद्रे उभारण्याला गती देण्यात आली आहे. ही कामे पूर्ण होऊन याच वर्षात ही केंद्रे सुरू होण्याची शक्यता आहे.


विदर्भातून उपचारासाठी नागपुरात येणाऱ्या वन्य प्राण्यांकरता एकही केंद्र नव्हते. त्यांच्यावर 'सेमिनरी हिल्स'वरील रोपवाटिकेत एका बाजूला उपचार करून मग बहुतेक प्राण्यांना महाराजबाग प्राणिसंग्रहालयात किंवा वन विभागाच्या पिंजऱ्यात ठेवले जात असे.

माजी मानद वन्यजीव रक्षक कुंदन हाते यांनी 'ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटर'ची संकल्पना वन विभागाकडे

मांडली. विभागाचे तत्कालीन सचिव प्रवीण परदेशी यांनी या संकल्पनेला बळ दिले आणि जागा व निधीची तरतूद करुन ‘सेमिनरी हिल्स’वर हे केंद्र सुरू झाले. त्यानंतर अमरावती, यवतमाळ, नाशिक, नांदेड, मुंबई, पुणे आदी जिल्ह्यांतून अशा केंद्राची मागणी होत होती. त्यानुसार ११ जिल्ह्यांत केंद्रे तयार करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. शासनाने तातडीने हा आराखडा मंजूर करून निधीही मंजूर केला.

**स्रोत** – ‘११ ‘ट्रान्झिट ट्रिटमेंट’ केंद्रांना गती; वन्यजीवांवरील उपचार सुलभ’, *www.loksatta.com*, ०१.०१.२०२३.

**राज्यात वन विभागात २५९ पदे रिक्त**



राज्यातील विभागीय वनाधिकारी संवर्गाच्या मंजूर १०९ पदांपैकी ८२ व साहाय्यक वनसंरक्षक संवर्गाच्या मंजूर २८९ पदांपैकी ८६ पदे रिक्त आहेत. तसेच विभागीय वनाधिकारी संवर्गातील १२ अधिकारी अखिल भारतीय सेवेत पदोन्नती झाल्याने आता नव्याने १२ जागा रिक्त होणार आहेत. त्यामुळे विभागीय वनाधिकारी संवर्गातील ९० टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त होतील.

ही पदे भरण्यामध्ये सर्वोच्च न्यायालयात पदोन्नत व सरळसेवा अधिकारी यांच्या ज्येष्ठताविषयक प्रलंबित असलेल्या खटल्याचा अडसर असल्याचे वृत्तात नमूद केले आहे. तसेच, राज्यात गेल्या चार वर्षांत पदोन्नती समितीची बैठक झालेली नाही. त्यामुळे विभागीय वनाधिकारी, साहाय्यक वनसंरक्षक आणि वन परिक्षेत्र अधिकारी अशी एकूण २५९ पदे चार वर्षांपासून रिक्त आहेत.

सद्यस्थितीत अनेक ठिकाणी ही पदे इतर कनिष्ठ अधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचारी यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून कामे उरकली जात आहेत. अतिरिक्त कार्यभार देतानाही नियमावलीचे पालन केले जात नाही. पदोन्नतीची प्रक्रियाच होत नसल्याने अनेक अधिकारी पदोन्नतीच्या प्रतीक्षेत वयोमर्यादेनुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेच्या अधीन राहून ही पदे पदोन्नतीने तात्काळ भरण्याची मागणी ‘महाराष्ट्र राजपत्रित वन अधिकारी संघटने’ने केली आहे.

**स्रोत** – ‘विभागीय वनाधिकारी संवर्गातील ९० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त; वन्यजीव संरक्षण वृक्ष लागवडीच्या कामावर परिणाम’, *www.loksatta.com,*२०.१२.२०२२.
‘वन खात्यातील पदोन्नतीला चार वर्षांपासून ‘ब्रेक’’, *www.esakal.com*, २६.११.२०२२.

## माथेरान पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र

**माथेरानच्या टेकडीखालून बोगदा खणण्यास केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी**

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या प्रादेशिक समितीने माथेरान टेकडीच्या खालून चार पदरी मार्गासाठी बोगदा खणण्यास मंजुरी दिली आहे. तसेच, या खोदकामासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळ अर्थात ‘नॅशनल बोर्ड फॉर वाइल्डलाईफ’ (NBWL)कडून मंजुरी घेण्याची गरज नसल्याचे म्हटले आहे.

बडोदा – मुंबई द्रुतगती मार्ग माथेरानच्या परिसरातून जाणार आहे. त्याकरता हा बोगदा खोदावा लागणार आहे. बोगद्याच्या दोन्ही खुल्या बाजू माथेरानच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भागाच्या बाहेर असल्यामुळे या बोगद्याला मंजुरी देण्याचा मुद्दा राज्य सरकारने ६ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या प्रकल्पविषयक बैठकीत उपस्थित केला होता. त्यापाठोपाठ केंद्रीय मंत्रालयाने मंजुरी दिल्याचे स्पष्ट केले. या भागात वन्यजीवविषयक समस्या नाहीत, पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत अधिसूचित केलेले नाही. हे क्षेत्र पर्यावरण संरक्षण क्षेत्र २००६ अंतर्गत

घोषित केले जाते. त्यामुळे माथेरान टेकडीखालून बोगदा खणण्यासाठी NBWLची मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही, असे मंत्रालयाच्या समितीने म्हटले आहे.

मात्र, माथेरान परिसरात मलबार जाएंट स्क्विरल (शेकरू) या राज्य प्राण्यासह लक्षणीय जैवविविधता आहे, याकडे जाणकारांनी लक्ष वेधले आहे. शेकरू या प्राण्याचा वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत संरक्षण असलेल्या प्राण्यांच्या सूचीत समावेश आहे.

**स्रोत** – प्रयाग अरोरा-देसाई. 'State government gets green signal to build tunnel under Matheran Hill', www.hindustantimes.com, ०९.०१.२०२३.

## कोकण / पश्चिम महाराष्ट्र

### सह्याद्रीच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रातून ३८८ गावे वगळण्याचा राज्य सरकारचा निर्णय

पश्चिम घाट अर्थात सह्याद्रीच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात येणारी कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील ३८८ गावे वगळण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तसा प्रस्ताव राज्य केंद्राकडे पाठवणार असल्याची माहिती वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी डिसेंबरअखेरीस विधानसभेत दिली.

संवेदनशील क्षेत्रात समावेश करण्यात आल्यामुळे या गावांमधील रोजगार ठप्प झाले आहेत, अशी लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडण्यात आली होती. त्यावर जैवविविधता आणि हवामान बदलाचा विचार करून संवदेनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना काढण्याच्या अनुषंगाने राज्य शासन अभ्यास करून केंद्र सरकारकडे सुधारित अहवाल पाठवणार आहे. त्यापूर्वी संबंधित भागातील लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेणार असल्याचे वन मंत्र्यांनी सांगितले.

वर्ष २०१८ मध्ये ३८८ गावे वगळण्याचा प्रस्ताव तयार केला होता. मात्र, २०२१ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या सरकारने ती संख्या २२ वर आणली. आता एकनाथ शिंदे सरकारने तो निर्णय बदलून ३८८ गावे वगळण्याचा निर्णय घेतला आहे. यातील ९८ गावे रत्नागिरी जिल्ह्यातील आहेत, असे वन मंत्र्यांनी सांगितले. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड १ अंक* २)

**स्रोत** – 'पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून ३८८ गावे वगळणार; सुधारित अहवाल लवकरच केंद्राकडे – मुनगंटीवार', *www.loksatta.com,* ३०.१२.२०२२.

## पश्चिम महाराष्ट्र

### कराड तालुक्यात ऊसाच्या शेतात आढळली दुर्मीळ 'रस्टी स्पॉटेड कॅट'ची पिल्ले

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील मौजे बेलदरे इथे ऊसाच्या शिवारात वाघाटी अर्थात 'रस्टी स्पॉटेड कॅट' या मार्जार कुळातील सर्वात लहान प्रजातीची दोन पिल्ले आढळली.

ऊसतोड कामगारांनी कराड वन विभागाला संपर्क केला. त्यानंतर क्षेत्रीय वन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन ही पिल्ले ताब्यात घेतली. पुढील देखभालीसाठी या पिल्लांना मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात असलेल्या संशोधन केंद्रात पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

मांजराची ही प्रजाती 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर' (IUCN) च्या नामशेष होण्याची भीती असलेल्या यादीत आहे.

**स्रोत** – 'मोठे डोळे, गोलाकार कान अन् पाठीवर राखाडी ठिपके; साताऱ्यात आढळली दुर्मिळ वाघाटीची दोन पिल्ले', *maharashtratimes.com*, १४.१२.२०२२.

### जुन्नर इथे बिबट्या सफारी सुरू होण्याआधीच जाहिराती

'जुन्नर बिबट्या सफारी पाहण्यास चला' अशा जाहिराती

करून पर्यटनाच्या नावाखाली पैसे कमावणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा जुन्नरच्या उप वनसंरक्षकांनी दिला आहे. माणिकडोह बिबट्या निवारा केंद्रातील सोयीसुविधांची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.


जुन्नरला असलेल्या बिबट्याप्रवण क्षेत्रात राज्य सरकारने बिबट्या सफारी प्रकल्प करण्याची घोषणा केली आहे. सफारी प्रकल्प सुरू झालेला नसताना केवळ घोषणेच्या आधारे काही सहल आयोजकांनी बिबट्या सफारीच्या जाहिरातील समाज माध्यमांवर केल्या आहेत. या बाबीकडे वनाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले आहे.

बिबट्या सफारी प्रकल्प आंबेगव्हाण इथे होणार आहे. या प्रकल्पाचे स्वरूप कसे असेल, याची चित्रफीत पत्रकार परिषदेत दाखवण्यात आली. माणिकडोह केंद्रात सध्या ३९ बिबटे आहेत. मात्र, इथे येणाऱ्या बिबट्यांची संख्या जास्त आहे. या बिबट्यांची सोय करण्यासाठी वन विभागाने पाटबंधारे विभागाकडे १२ हेक्टर जागेची मागणी केली आहे. छोटे प्राणिसंग्रहालय उभारण्याचा प्रस्तावही दिला आहे, असे उप वनसंरक्षकांनी सांगितले.

**स्रोत** - '...तर गुन्हे दाखल करणार; बिबट्या सफारीची जाहिरात करणाऱ्यांवर वन विभागाचा कारवाईचा इशारा', *maharashtratimes.com*, ०७.०१.२०२३.

## विदर्भ

### छत्तीसगडमधून विदर्भात आलेले हत्ती परतीच्या मार्गावर



छत्तीसगडमधून येऊन ऑक्टोबर २०२२ पासून गडचिरोली, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात स्थिरावलेला जंगली हत्तींचा कळप डिसेंबरच्या मध्यात परतीच्या मार्गावर होता. हा कळप आलेल्या मार्गावरूनच परत जात असल्याने येत्या काही दिवसात छत्तीसगडमध्ये परतेल, अशी शक्यता अभ्यासकांनी वर्तवली आहे.

छत्तीसगडमधून धानोरा तालुक्यातील मुरुमगाव वन परिक्षेत्रात दाखल झालेल्या हत्तींच्या या कळपाने साधारण १०० ते १५० किमीचे अंतर पूर्ण केले. यादरम्यान, हा कळप ज्या भागात वावरला तिथे शेकडो हेक्टर शेतातील पिकांची नासधूस झाली, अनेक ठिकाणी घरांचीही मोडतोड झाली. गोंदिया व गडचिरोली इथे दोन व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. गोंदिया जिल्ह्यातील नागणडोह पाड्यात १२ ऑक्टोबरच्या रात्री हत्तींचा हा कळप शिरला. त्यामध्ये पाड्यातील घरांची व पिकांची नासधूस झाली. तेव्हा, जिल्हा प्रशासनाने ग्रामस्थांना बोरटोला इथे हलवले होते. त्यात १५ पुरुष, १४ महिला २६ लहान-मोठी मुले-मुली असे एकून ५५ लोक होते.

दरम्यान, भंडारा जिल्ह्यात हत्तींमुळे शेतकऱ्यांचे ३२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे वन विभागाने केलेल्या पंचनाम्यात दिसून आले आहे. नुकसानीचे पंचनामे वन विभाग तातडीने करत असला तरी मदतीचे दावे शासनाकडे प्रलंबित असल्याने अनेकांना भरपाई मिळालेली नाही.

छत्तीसगडसह महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या अन्य राज्यांमध्ये हत्तींची संख्या वाढत असल्याने नवीन अधिवासाच्या शोधात निघालेले हत्ती राज्यात येतात. गोंदिया व भंडारा जिल्ह्यांत यंदा आलेल्या हत्तींना सांभाळण्यात राज्याच्या वन विभागाचा अनुभव कमी पडला. त्यामुळे वाघ, बिबट्यासह हत्तींना नियंत्रित करण्याचे प्रशिक्षण स्थानिक वनाधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेण्याची गरज वृत्तात व्यक्त केली आहे.

तसेच, हत्ती पाहण्यासाठी लोक गर्दी करतात व त्यामुळे हत्ती चवताळतात व त्यातून लोकांचे नुकसानही वाढते. हे लक्षात घेता परिस्थिती संयमाने हाताळण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. त्याकरता जनजागृतीची

आवश्यकता असल्याचे वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १, खंड ३ अंक ४*)



**स्रोत** – ‘हुश्श्…! रानटी हत्ती परतीच्या मार्गावर; छत्तीसगडच्या दिशेने कूच’, *www.loksatta.com*, १५.१२.२०२२.
‘हत्तींकडून शेतकऱ्यांचे ३२ लाखांचे नुकसान; भंडारा जिल्ह्यातील ३१ गावांत धुमाकूळ’, *maharashtratimes.com*, १७.१२.२०२२.
‘रानटी हत्तींचे ‘अपडाऊन’ सुरूच: भंडारा जिल्ह्यातून पुन्हा गोंदियात परतले; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण’, *www.loksatta.com*, ०६.१२.२०२२.
‘रानटी हत्ती गावात अन् गावकरी विस्थापित; नागणडोहवासियांची दिवाळी आश्रय छावणीतच!’, *www.loksatta.com*, २०.१०.२०२२.

**टी-६ वाघिणीला जेरबंद करण्यासाठी वन विभाग पुन्हा सक्रीय; हल्ल्यांत मृतांची संख्या १०**


आपल्या चार पिल्लांसह गडचिरोली वन विभागातील चातगाव वन परिक्षेत्रात वावरणाऱ्या ‘टी-६’ वाघिणीच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गडचिरोली आणि देसाईगंज वन विभागात टी-६ च्या हल्ल्यात ठार झालेल्या व्यक्तिंची संख्या १० झाली आहे. त्यामुळे, या वाघिणीला जेरबंद करण्यासाठी वन विभाग पुन्हा सक्रीय झाला आहे.

प्रौढ वाघाला पकडताना बेशुद्ध करण्यासाठी इंजेक्शनचा वापर करतात. मात्र, पिल्लांना पकडताना जाळीचा वापर करावा लागणार आहे. त्यामुळे चार पिल्ले असलेल्या वाघिणीला पकडणे आव्हानात्मक ठरणार आहे. यासाठी वन विभाग काही संस्थांची मदत घेणार आहे.

डिसेंबरपूर्वीच टी-६ला जेरबंद करण्यासाठी वन विभाग सक्रीय झाला होता. चंद्रपूर आणि मेळघाट वन विभागांतील पथकाला टी-६ने हुलकावण्याही दिल्या. डिसेंबरच्या सुरुवातीला टी-६ वाघिणीने चार पिलांना जन्म दिल्याचे स्पष्ट झाले. राजागाटा चेक परिसरातील जंगलात वन विभागाने लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात ९ डिसेंबरच्या रात्री टी-६ चार पिल्लांसह दिसून आली. त्यामुळे तिला जेरबंद करण्याची मोहीम स्थगित करण्याचा निर्णय वन विभागाने घेतला. मात्र, डिसेंबर महिन्यात एकाच आठवड्यात तिच्या हल्ल्यांत चातगाव वन परिक्षेत्रात दोन व्यक्तिंचा मृत्यू झाला. त्यामुळे वन विभाग तिला जेरबंद करण्याची मोहीम पुन्हा सुरू करण्याचा निर्णय वनाधिकाऱ्यांनी घेतला.

दरम्यान, पिल्ले सोबत असताना वाघीण खूप आक्रमक असते, हे लक्षात घेऊन परिसरातील नागरिकांनी सावध राहावे, असा इशारा वन विभागाने दिला आहे.

**स्रोत** - ‘गडचिरोली : ‘टी ६’ वाघिणीने घेतला १० वा बळी; जखमी महिलेचा मृत्यू’, *www.loksatta.com*, २७.१२.२०२२.
‘बधाई हो…! टी-६ वाघिणीने दिला ४ पिलांना जन्म’, *www.loksatta.com*, १०.१२.२०२२.



**अकोला जिल्ह्यात माकडांच्या त्रासावर बेकायदा उपाययोजना; वन विभागाकडून चौकशी**

माकडांमुळे होणारा त्रास कमी करण्यासाठी केलेल्या बेकायदा उपाययोजनेमुळे कार्ला गावातील रहिवासी अडचणीत आले आहेत.

अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यात असलेल्या कार्ला गावात माकडांमुळे मोठ्या प्रमाणात उपद्रव होत होता. घरांच्या छतावर उड्या मारणे, माणसांच्या अंगावर धावणे, थेट घरात घुसून मिळेल त्या गोष्टींवर ताव मारणे, शेतीचे नुकसान होत असल्यामुळे ग्रामस्थ त्रासले होते. गावातील रहिवाशांनी २५,००० ते ३०,००० रूपये वर्गणी गोळा केली आणि औरंगाबादेतील काही खाजगी लोकांना माकडांचा बंदोबस्त लावण्यासाठी कंत्राट दिले. कंत्राट घेतलेल्यांनी २६ नोव्हेंबर रोजी ३५ पेक्षा जास्त माकडे पकडली व लोंखडी पिंजऱ्यात घालून गावाबाहेर नेली.

दरम्यान, अकोला आणि पातूर वन विभागाला या घटनेविषयी माहिती नव्हती. मात्र, माकडे पकडून नेत असताना काही लोकांनी आपल्या मोबाईलमध्ये केलेल्या चित्रफीती समाजमाध्यमांवर पसरल्यामुळे हे प्रकरण उघडकीस आले.

अशी उपाययोजना करणे बेकायदा आहे त्यामुळे वन विभागाने या प्रकरणाच्या चौकशीला सुरुवात केली. यामध्ये दोषी आढळलेल्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. वन विभागाने माकडे पकडण्यासाठी कोणतीही परवानगी दिलेली नाही, असे अकोला वन विभागाच्या उप वनसंरक्षकांनी स्पष्ट केले.

**स्रोत** - अक्षय गवळी. ‘संपूर्ण गावाला माकडांचा त्रास, बंदोबस्तासाठी गावकऱ्यांची भन्नाट आयडिया; मात्र तीच कल्पना गावकऱ्यांच्या अंगलट’, *maharashtratimes.com*, २६.११.२०२२.


**गोरेवाडा इथून वाघबिबटे जामनगरला रवाना**

गोरेवाडा बचाव केंद्रातील चार वाघ आणि चार बिबटे २१ जानेवारी रोजी रात्री गुजरातेतील जामनगर इथे पाठवण्यात आले. ही कार्यवाही गुप्तता बाळगून करण्यात आल्यामुळे प्रसारमाध्यमांनी प्रशासनावर टीका केली आहे.

ब्रह्मपुरी वन विभागातून जेरबंद केलेल्या एका वाघासह एक वाघीण गोरेवाडा प्रशासनाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडे ११ जानेवारी रोजी पाठवली. त्यावेळी प्राणिसंग्रहालय प्रशासनाने निवेदन जारी करून प्रसारमाध्यमांना त्याविषयी कळवले होते. यावेळी आठ वाघबिबटे पाठवल्याबाबत मात्र प्रशासनाने गुप्तता राखली. मात्र, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी वाघवाघिणीची जोडी नेते वेळी जामनगर इथल्या खाजगी प्राणिसंग्रहालयाचे पथक गोरेवाडा इथे उपस्थित होते, असे नमूद केले आहे.

दरम्यान, राज्य शासन व केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण अर्थात ‘सेंट्रल झू ऑथॉरिटी’ (CZA) च्या निर्देशानुसार ही वाघबिबटे पाठवण्याची कार्यवाही केल्याचे गोरेवाडा केंद्राचे विभागीय व्यवस्थापक शतानिक भागवत यांनी सांगितले. मात्र, CZAने ज्या वाघाला नेण्याची परवानगी दिली होती त्या वाघाला न नेता दुसऱ्याच वाघाला जामनगरचे पथक घेऊन गेले. त्यामुळे CZA च्या नियमांचे उल्लंघन झाले आहे, असे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – योगेंद्र शंभरकर. ‘महाराष्ट्रातले चार वाघ अन् चार बिबटेही पाठवले गुजरातला’, *www.lokmat.com*, २४.०१.२०२३.



## विदर्भातील सारस क्रौंच पक्ष्यांची नेमकी संख्या अज्ञात

सारस क्रौंच (क्रेन) पक्ष्यांच्या संवर्धनासाठी मध्य प्रदेश सरकारने गांभीर्याने उपाययोजना केल्यामुळे तिथल्या बालाघाट जिल्ह्यात त्यांची संख्या ५०वर गेली आहे. तिथून हे पक्षी गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये येत असल्याने महाराष्ट्रातील त्यांची संख्या वाढल्याचा अंदाज आहे. एरवी महाराष्ट्रातील या पक्ष्यांची ताजी आकडेवारी उपलब्ध नाही. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ३*)

महाराष्ट्रात गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांत ३४ सारस क्रौंच पक्ष्यांची नोंद आहे. मात्र, हे पक्षी महाराष्ट्रातीलच आहेत की मध्य प्रदेशात मोजणी झालेल्यांपैकीच आहेत, हा प्रश्न आहे. त्यात महाराष्ट्रात डिसेंबर महिन्यात चार पक्ष्यांचा मृत्यू झाला. त्यांचा अधिवास आणि प्रजननास योग्य जागा कमी होत आहेत. वर्ष २०२२ मध्ये या पक्ष्याची महाराष्ट्रात केवळ तीन घरटी सापडली.

विजेच्या धक्क्यानेही काही सारस पक्ष्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे उपाययोजनांसाठी महावितरणने ४५ कोटींचे अंदाजपत्रक दिले. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर सारस संवर्धनासाठी गोंदिया जिल्ह्याने ६१ कोटी रुपये, भंडारा जिल्ह्याने नऊ कोटी रुपये आणि चंद्रपूर जिल्ह्याने अडीच कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले. मात्र, संवर्धनावरील तरतुदीचे आकडे फुगवण्यापेक्षा या पक्ष्याच्या संरक्षणासाठी साधे उपाय परिणामकारक ठरू शकतात. जसे, साध्या 'पीव्हीसी पाइप'ने वीजवाहिन्या झाकल्या तरीही त्यातून अपेक्षित परिणाम साधला जाईल, असे गोंदिया जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक सावन बाहेकर यांनी सुचवले आहे. तसेच, वन खाते आणि जिल्हा प्रशासनाने सारस क्रौंच पक्ष्याच्या अधिवासाच्या संरक्षणासाठी नदीतील अवैध वाळू उत्खनन रोखणे, पाणथळ जमिनींच्या संरक्षण, संवर्धन या बाबींकडे लक्ष पुरवावे, असे ते म्हणाले.

**स्रोत** – 'मध्य प्रदेशातील सारसांमुळे महाराष्ट्रात संख्या वाढ?; राज्यातील प्रत्यक्ष आकड्याबाबत प्रश्नचिन्हच', *www.loksatta.com*, २०.१२.२०२२.



## माळढोक पक्ष्याचे चंद्रपुरात दर्शन

चंद्रपूर जिल्ह्यात माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पक्षी दिसून आल्यामुळे त्याचे अस्तित्त्व राज्यात शिल्लक असल्याची खात्री झाली आहे. जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांत एकदाही माळढोकाचे दर्शन झाले नव्हते.


चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील ज्या शेतकऱ्याच्या शेतात हा पक्षी आढळून आला, त्याने त्याचे छायाचित्र घेतले. ते त्याने चंद्रपुरातील वन्य जीव अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांना पाठवले. ते पाहून तो पक्षी माळढोक असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात कोविडच्या साथीपूर्वी दोन वेळा सर्वेक्षण झाले. मात्र, त्या दोन्ही वेळी माळढोक दिसला नव्हता, असे चोपणे म्हणाले. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक १, खंड ३ अंक ३*)

**स्रोत** – निलेश झाडे. 'माळढोक नामशेष झाल्याच्या चर्चा फोल, अखेर दर्शन घडलंच, पक्षीप्रेमींमध्ये आनंदाची लाट', *maharashtratimes.com*, ०५.११.२०२२.

<u>माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त</u>

| जिल्हा | तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| कोल्हापूर | शाहूवाडी | केदारलिंग इथे बिबट्याच्या हल्ल्यात १० वर्षांची मुलगी ठार | ईसकाळ, २१.१२.२०२२ |
| ठाणे | इगतपुरी | वाडीवऱ्हे इथे मुंबई-आग्रा महामार्गावर बिबट्याला वाहनाची धडक; जमलेल्या गर्दीतील एकावर जखमी बिबट्याचा हल्ला | महाराष्ट्र टाइम्स १९.११.२०२३ |
| | कल्याण शहर | १० तासांच्या प्रयत्नांती बिबट्या जेरबंद; तोवर पाच जण जखमी | महाराष्ट्र टाइम्स २७.११.२०२३ |
| | शहापूर | कसारा इथे शेतात काम करणारा तरुण बिबट्याच्या हल्ल्यात जखमी | महाराष्ट्र टाइम्स २३.११.२०२३ |
| नाशिक | सिन्नर | मलढोण इथे १५ मिनिटांच्या अंतराने दोन दुचाकीस्वारांवर बिबट्याचे हल्ले; एक जण पंजा लागून जखमी | महाराष्ट्र टाइम्स २१.०१.२०२३ |
| | | सिन्नरजवळ बिबट्याच्या हल्ल्यात नऊ वर्षीय मुलगी जखमी | महाराष्ट्र टाइम्स १२.१२.२०२२ |
| | नाशिक | मनोली भागात बिबट्याच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी | महाराष्ट्र टाइम्स १२.१२.२०२२ |
| | त्र्यंबकेश्वर | वेलुंजे परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात सहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू | महाराष्ट्र टाइम्स २५.१२.२०२२ |
| पुणे | जुन्नर | पोल्ट्रीत बिबट्या शिरला; सव्वाशे कोंबड्या मृत्युमुखी; मात्र वन विभागाकडे पक्ष्यांसाठी नुकसानभरपाईची तरतूद नाही | महाराष्ट्र टाइम्स २०.०१.२०२३ |
| | | कल्याण नगर महामार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्या जखमी; बघ्यांपैकी तिघांवर जखमी बिबट्याचा हल्ला | महाराष्ट्र टाइम्स २३.१२.२०२२ |
| | शिरूर | आमदाबाद इथे बिबट्याच्या हल्ल्यात दोन शेतकरी जखमी | महाराष्ट्र टाइम्स १०.०१.२०२३ |
| सातारा | पाटण | शिंगणवाडी इथे बिबट्याच्या हल्ल्यात एक म्हैस व चार शेळ्या ठार | ईसकाळ, १७.११.२०२२ |
| | कराड | वसंतगड आणि सावंतवाडी या दोन भागांमध्ये भरवस्तीत बिबट्याचा वावर; पाळीव जनावरांसह भटक्या कुत्र्यांची शिकार | ईसकाळ, २४.११.२०२२ |



## माणूस-वाघ संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| गडचिरोली | गडचिरोली | पोर्ला वन परिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात वृद्धेचा मृत्यू | लोकसत्ता, २३.१२.२०२२ |
| | धानोरा | चातगाव वन परिक्षेत्रात टी-६ वाघिणीच्या हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू; टी-६ च्या हल्ल्यांमध्ये ठार झालेल्यांची संख्या १० | लोकसत्ता, २७.१२.२०२२ |
| गोंदिया | अर्जुनी मोरगाव | गोठणगाव वन परिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू | लोकसत्ता, १२.०१.२०२३ |
| चंद्रपूर | ब्रह्मपुरी | टेकरी व तोरगावात लागोपाठ दोन दिवस वाघाच्या हल्ल्यांत दोन महिला ठार | लोकसत्ता, ३१.१२.२०२२ |
| | भद्रावती | माजरी इथे पिकाच्या रक्षणासाठी लावलेल्या विजेच्या जिवंत तारेचा स्पर्श झाल्याने वाघिणीचा मृत्यू | लोकसत्ता, १५.०१.२०२३ |
| यवतमाळ | वणी | कोलार पिंपरी इथे वाघ जेरबंद; या वाघाच्या हल्ल्यांत दोघांचा मृत्यू व एक जखमी | लोकसत्ता, ०७.१२.२०२२ |
| गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा | - | जानेवारी ते नोव्हेंबर या ११ महिन्यांत व्याघ्र हल्ल्यांच्या ६० घटना | लोकमत, २८.१२.२०२२ |

## राष्ट्रीय बातम्या

**देशातील प्रत्येक पाचपैकी दोन पाणथळ जागा नष्ट; स्वयंसेवी संस्थेचे निरीक्षण**



देशातील पाणथळ जागा नष्ट होण्याचा वेग वाढत असून, दर पाचपैकी दोन पाणथळ जागा नष्ट झाल्याचे निरीक्षण 'वेटलँड इंटरनॅशनल' या संस्थेने नोंदवले आहे.

गेल्या ३० वर्षांमध्ये ४०% पाणथळ जागांची जैवविविधतेचे संवर्धन करण्याबाबतची गुणवत्ता ढासळली आहे. देशात सध्या २.५ लाख मोठी पाणथळ क्षेत्रे, तर ५.५ लाख लहान पाणथळ क्षेत्रे आहेत. मोठी पाणथळ क्षेत्रे प्रत्येकी २.२५ हेक्टर परिसरात पसरलेली आहेत. लहान पाणथळ क्षेत्रांपैकी ६०,००० पाणथळ क्षेत्रे ही संरक्षित वन क्षेत्रात आहेत. उर्वरित पाणथळ क्षेत्रांपैकी १५० ते २०० पाणथळ क्षेत्रांचे संवर्धन करण्याचे काम सुरू आहे.

शहरांमध्ये या पाणथळ क्षेत्रांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही. जसे की मुंबईसारख्या ठिकाणी पाणथळ जागांवर खारफुटी (मँग्रूव)चे प्रमाण वाढत आहे. मात्र, ही खारफुटी वाढण्यासाठी पाणथळ परिसरात निर्माण झालेला गाळ आणि त्यामुळे खारफुटीच्या विस्ताराला मिळालेली चालना कारणीभूत आहे, असे खारफुटी संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या नंदकुमार पवार यांनी सांगितले.

शिवडी परिसरात पाणथळ जागांवर भराव घालून बांधकाम होत आहे. पाणथळ जागांच्या व्याख्येबाबत सुस्पष्टता नसल्यामुळे प्रत्येक पाणथळीचे संरक्षण करणे शक्य होत नाही. या जागा पाणथळ म्हणून घोषित न झाल्याने त्यांवर भराव घातले जातात. या बाबींकडे संस्थेसह जाणकारांनी लक्ष वेधले आहे.

**स्रोत** – 'पाणथळ जागांना धोका; देशातील ४० टक्के

जागांची जैवविविधता संवर्धनाची गुणवत्ता ढासळली', *maharashtratimes.com*, २१.०१.२०२३.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

### जैवविविधता असलेल्या जमिनीच्या संरक्षणाचे लक्ष्य गाठण्यात आशियाई देश अपयशी

आशियातील बहुतांश देश वर्ष २०२० पर्यंत किमान १७% जैवविविधता असणाऱ्या जमिनीचे संरक्षण करण्याचे लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरले आहेत. ४० देशांच्या आकडेवारीच्या आधारे अभ्यास करून संशोधक या निष्कर्षांपर्यंत पोहोचले आहेत. या विषयीचा शोधनिबंध 'कम्युनिकेशन बायोलॉजी' या विज्ञान पत्रिकेत प्रकाशित झाला आहे.

'यूएन ग्लोबल बायोडायवर्सिटी फ्रेमवर्क'चे वर्ष २०३० चे किमान ३०% जमिनीचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट साध्य होईल की नाही याबाबत शंका आहे. वर्ष २०१० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या जैवविविधताविषयक अधिवेशनात सुमारे २०० देशांनी २०२० पर्यंत आपापल्या भूभागाच्या किमान १७% जमिनीचे संरक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. हे उद्दिष्ट त्यांनी गाठले आहे का हे तपासण्यासाठी इंग्लंडमधील ऑक्सफर्ड, केंब्रिज विद्यापीठांतील संशोधकांनी व आशियातील सहयोगींनी संरक्षित क्षेत्रांवरील जागतिक 'डेटाबेस'कडे आलेल्या अधिकृत अहवालांमधील माहितीचे विश्लेषण केले. त्यात दिसून आले आहे की पश्चिम आणि मध्य आशियातील फारच कमी देशांना नियोजित लक्ष्य गाठता आले आहे.

एकूणच, आशियाची कामगिरी ही सर्वात वाईट आहे. पूर्व आणि दक्षिण आशियातील १६ देशांनी २०२० पर्यंत १७% संरक्षणाचे लक्ष्य गाठले आहे. पश्चिम आणि मध्य आशियातील १९ पैकी १४ देशांनी लक्ष्य गाठले नाही. आशियाई देशांनी जैवविविधतेच्या संवर्धनासाठी संरक्षित जमिनीच्या प्रमाणात प्रति वर्षी फक्त ०.४% एवढी मंद गतीने वाढ केली आहे.

संपूर्ण आशियातील धोकाग्रस्त सस्तन प्राण्यांच्या २४१ प्रजातींपैकी सरासरी ८४% प्राणी संरक्षित क्षेत्राच्या बाहेर पडले, असेही यात संशोधकांनी नमूद केले आहे. संरक्षणासाठी सध्याची गती पाहता २०३० पर्यंत केवळ १८% उद्दिष्ट साध्य होईल, असा निष्कर्ष शोधनिबंधात मांडला आहे.

**स्रोत** – 'जैवविविधता असलेल्या जमिनीच्या संरक्षणाचे लक्ष्य गाठण्यात आशिया अपयशी', *www.loksatta.com,*०८.१२.२०२२.



'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या यापूर्वीच्या अंकांच्या छापील प्रती 'कल्पवृक्ष'च्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

या प्रती घेण्यास आपण इच्छुक असाल तर ई-मेल - **marathipaupdate@gmail.com** इथे संपर्क करावा.

त्यामध्ये तुमचा पत्ता व तुम्हाला हव्या असलेल्या अंक/प्रतींची संख्या कळवावी. ई-मेलचा विषय "छापील प्रती" किंवा "Print Issues" असा असावा.तुमच्या पत्त्यावर या छापील प्रती **विनामूल्य** पाठवल्या जातील.

शाळा, महाविद्यालयांच्या वाचनालयात ठेवण्यासाठी, वन विभागाच्या आघाडीवरील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना या प्रती भेट म्हणून पाठवता येतील.

विद्यार्थी, शिक्षक, वनकर्मचारी तसेच संरक्षित क्षेत्रांजवळ राहणाऱ्या ग्रामस्थांची या विषयीची समज वाढवण्याकरता हे प्रकाशन उपयुक्त ठरू शकेल, अशी आमची अपेक्षा आहे.

# मृत्यूलेख

## पर्यावरण रक्षणासाठी व्यवस्थेशी संघर्ष करणारी कुसुम!

भारतीय जंगलांचा चालताबोलता माहितीकोश म्हणजे पर्यावरणस्नेही जीवनशैलीचा आदर्श वस्तुपाठ असणारी कुसुम कर्णिक! ती अस्सल कार्यकर्ता होती. २ नोव्हेंबर २०२२ रोजी कुसुम पंचतत्त्वात विलीन झाली. आहुपे देवराईच्या परिसरात तिला चिरविश्रांती घ्यायची होती. परंतु, काही व्यावहारिक अडचणींमुळे ते शक्य झाले नसले, तरी तिच्या अस्थी तिथे विसर्जित केल्या गेल्या याचे समाधान आहे.

१९८४ साली भीमाशंकर परिसरातील आहुप्याची देवराई तोडण्याचा घाट घातला जात होता. त्यावेळी उत्तराखंडातील 'चिपको आंदोलना'ने प्रेरित झालेल्या कुसुमने उत्स्फूर्तपणे लोकांच्या सक्रीय सहभागाने चिपको आंदोलन करून देवराई वाचवली. १९८५ मध्ये भीमाशंकरचे जंगल अभयारण्य म्हणून जाहीर झाले. स्थानिक लोकांना तिथून उठावे लागणार म्हटल्यावर कुसुमच्या पुढाकाराने स्थानिक रहिवाशांनी लढा पुकारला. 'जंगल आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे' हा नारा महाराष्ट्रभर दुमदुमला. इतर अभयारण्यांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर अभयारण्य परिषदांची सुरुवात झाली. १९९२ सालापासून विविध राज्यांत चार अभयारण्य परिषदा झाल्या. यात तज्ञ, अभ्यासक आणि निसर्गप्रेमीही सहभागी झाले होते. यामधून अभयारण्य कल्पनेचे मूल्यमापन, तिची योग्यायोग्यता, स्थानिक लोकांचे त्यांच्या जंगलाशी असलेले नाते स्पष्ट होत गेले. नंतरच्या काळात कुसुमने सात राज्यांमधून ४५ दिवसांची 'जंगल जीवन बचाव' यात्रा काढली.

१९९८ साली देशातील सात राष्ट्रीय उद्यानांमधील 'इंडियन इको-डेवलपमेंट प्रोजेक्ट' अर्थात 'भारतीय पर्यावरण विकास प्रकल्पा'चा अभ्यास तिने केला. अनेक प्रकल्पांमार्फत स्थानिकांचे जंगलाशी असणारे नाते तोडण्याचा प्रयत्न केला जातो. हे नाते तुटले की लोक जंगलाविषयी उदासीन होतात व जंगलाचा ऱ्हास होतो हे आता सिद्ध झाले आहे. शिवाय भले मोठे कर्ज देशाच्या उरावर बसते. हे सर्व जीव तोडून सांगत कुसुम लोकांमध्ये अथकपणे जाणीवजागृतीचे काम ४०-५० वर्षे करत होती.

पर्यावरणरक्षणासाठी सर्व पातळ्यांवर परिवर्तनाची गरज आहे, अशी तिची ठाम भूमिका होती. त्यासाठी संघर्ष उभारायला 'एकजूट संघटना' आणि नवनिर्माण व रचनात्मक कामासाठी 'शाश्वत संस्था' अशी तिची दोन्ही हातांनी लढाई चालू होती. पर्यावरणरक्षणासंदर्भातील योगदानासाठी'शाश्वत संस्थे'ला जागतिक पातळीवरील 'यू.एन.डी.पी. इक्वेटर इनिशिएटिव'तर्फे'इक्वेटर प्राईझ' २०१२ साली मिळाले.

देवराई हे आदिवासी जीवनाचे मोठे संचित आहे. निगुतीने जंगल वापरणारा आदिवासी हा कष्टाळू, सोशीक आणि माणुसकीने वागणारा आहे. त्याला जंगलभक्षक म्हटले तर कुसुम संतापत असे. शहरी पर्यटकांच्या साहसी वृत्ती, चैन, विलासवादाला खूप फांद्या फुटत आहेत. त्यांच्या या संदर्भात वागण्याबोलण्याचा प्रतिकूल परिणाम स्थानिकांवर होतो. त्यांना या पर्यटकांसारखे जगावेसे वाटते आणि ते सुखलोलुपतेकडे ओढले जातात. त्यातून पर्यावरणीय सांस्कृतिक धूप झपाट्याने होते असे ती शहरी मध्यम, उच्च मध्यमवर्गीयांना, स्थानिकांना तळमळीने सांगत असे. त्यासाठी प्रसंगी आक्रमक होत असे.

डोंगर कापून, तळी-नद्या-समुद्र बुजवून होणारा विकास विनाशकारी आहे, ही धोक्याची घंटा ती दोन्ही हातांनी घणाघणा वाजवत होती. पण चंगळवादात आत्ममग्न असणाऱ्या आपल्याला ती ऐकूच आली नाही. त्याचे भयावह परिणाम आपण भोगत आहोत. आता तरी खडबडून जागे होऊन पर्यावरणस्नेही जीवनशैलीची कास धरूया! हीच तिच्या कार्यकर्तृत्वाला आदरांजली ठरेल.

- **डॉ. गीताली वि. मं.**

- geeetali.mandakini@gmail.com

लेखिका 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या संपादक आणि 'शाश्वत ट्रस्ट'च्या संस्थापक विश्वस्त आहेत.

**AVAILABLEAT 25% DISCOUNT**

# The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra

## News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by


DuleepMatthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books

**Contents:**

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*:Bhimashankar WLS, Bhorgad CR, Bor WLS, GautalaAutramghat WLS, Kolamarka CR, Great Indian Bustard Sanctuary, Gyanganga WLS Jaikwadi Bird Sanctuary, Kalsubai-Harishchandragad WLS, Karnala WLS, Lonar WLS, Mahabaleshwar ESZ, Mahendri Reserve Forest, Mansingdeo WLS, Matheran ESZ, Muniya CR, NandurMadhmeshwar Bird Sanctuary, Radhanagari WLS, Rehekuri Blackbuck Sanctuary, Sanjay Gandhi NP, Sewri Wetlands, Tansa WLS, Thane Creek WLS, Tipeshwar WLS, Tungareshwar WLS, Umred-Karhandla WLS, Yawal WLS, Melghat TR, Nawegaon-Nagzira TR, Pench TR, Sahyadri TR, Tadoba-Andhari TR, Tigers, General News from Maharashtra




**- Section 2:***Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (ShibaDesor); 4)Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line-drawings by Ashvini Menon

For copies at 25% discount write to psekhsaria@gmail.com

# थोडक्यात पण महत्त्वाचे...

## समृद्धी महामार्गाच्या निमित्ताने

नागपूर ते शिर्डी समृध्दी महामार्गाचे उद्घाटन होऊन महिना झाला, तरी या नव्या महामार्गावरच्या अपघातांचे प्रमाण काही कमी होताना दिसत नाही. वाहनांच्या प्रचंड वेगामुळे अपघातांत प्रवाशांचे जीव जाताहेत, हे लक्षात आल्यावर वेगावर नियंत्रण आले. पण, महामार्गावर अनेक वन्य जीवही हकनाक मारले जात आहेत, त्यावर अद्याप काही उपाय केला गेलेला दिसत नाही.

डिसेंबर महिन्यात नीलगायीने कारला धडक दिल्यामुळे दोन जणांचा मृत्यू झाला होता. जानेवारीमध्ये अज्ञात वाहनाच्या धडकेने १४ रानडुकरांचा बळी घेतला. असे काही होईल अशी शंका महामार्गाचे काम सुरू असतानाच घेतली गेली होती. त्यावेळी वन्य प्राण्यांना महामार्ग ओलांडणे सोपे व्हावे यासाठी खास मार्गिका ठेवण्यात येतील, असे सांगितले गेले होते. तशा मार्गिका बनवल्याही आहेत. तरीदेखील अपघातांमध्ये वन्य प्राण्यांचा जीव जाण्याचे प्रकार घडत आहेतच. त्यामुळे आता वन्य प्राण्यांसाठीच्या मार्गिका योग्य ठिकाणी बनवल्या आहेत की नाहीत, सर्व वन्य प्राणी एकच मार्गिका वापरतील, असे चुकीचे गृहितक धरून तर त्यांची आखणी झालेली नाही ना, म्हणजेच थोडक्यात धड अभ्यास न करता मार्गिका बांधण्याचे काम उरकले गेले का, अशा शंका घेतल्या जात आहेत. शिवाय नीलगायी, रानडुकरे यांसारखे 'छोटे', सर्वसामान्यांच्या दृष्टिकोनातून 'बिन महत्त्वाचे' प्राणी मृत्यूमुखी पडत आहेत, तोवर याचे गांभीर्य धोरणकर्त्यांना उमजणारच नाही का, असे हतबल करणारे प्रश्नही अनेकांना पडत आहेत.

एकीकडे वर्षाच्या सुरुवातीला अशा त्रासदायक बातम्या येत असतानाच, सरत्या वर्षाने काही चांगल्या बातम्याही आपल्याला दिल्या. मला त्यातली सर्वांत महत्त्वाची वाटते ती कर्नाळा पक्षी अभयारण्यात झालेल्या पक्षीगणनेची. डिसेंबर महिन्यात पार पडलेल्या या पक्षीगणनेत पक्ष्यांच्या १३९ आणि कीटक व अन्य प्राणी मिळून एकूण १९३ प्रजातींचा वावर या जंगलात आढळून आला आहे. या गणनेच्या वेळी 'पेंटेड स्परफाऊल' हा दुर्मीळ पक्षी कर्नाळा पक्षी अभयारण्यात आढळल्याची ही पहिलीच नोंद झाली. वन्य जीव संरक्षणाबाबत आस्था बाळगणाऱ्या सर्वांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

मात्र, माझ्या दृष्टीने त्याही पलिकडे जाऊन या बातमीत आनंदी होण्यासारखे विशेष कारण आहे. ते म्हणजे या पक्षीगणनेतील नागरिकांचा सहभाग. रायगड जिल्ह्यातल्याच फणसाड अभयारण्यात यापूर्वी झालेल्या अशा गणनेत एकूण २५३ प्रजातींची नोद झाली होती. त्याबद्दल बोलताना पक्षी अभ्यासक आणि या गणनांचे आयोजन करणाऱ्या 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट'चे संस्थापक निखील भोपळे यांनी खूप मोलाचा मुद्दा सांगितला. फणसाड इथे २० वर्षांच्या अथक अभ्यासाने २८० प्रजातींची नोंद करणारे निखील भोपळे लोकसहभागामुळे अवघ्या १२ दिवसांत २५३ पक्ष्यांची नोंद झाल्याने आनंदित आहेत. लोकसहभागाचा अशा पद्धतीचा लाभ वन विभागाने करून घेतल्यास वन्यजीव संरक्षण आणि त्याबाबत जनजागृती अशी दोन्ही लक्ष्ये आपसूकच साध्य होतील, असे वाटते. कर्नाळा अभयारण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मुंबई-गोवा महामार्गाच्या दुतर्फा हे अभयारण्य पसरलेले आहे. त्यामुळे समृद्धी महामार्गाप्रमाणेच या महामार्गावरही वन्य प्राण्यांच्या अपघाताचा धोका आहे. मात्र, या पक्षीगणनेने दाखवून दिलेला लोकसहभागाचा मार्ग अनुसरल्यास त्यावरही उपाय निघू शकेल, किमानपक्षी वन्यजीव संवर्धनाबाबतच्या जनजागृतीला तरी हातभार लागू शकेल.

- **अभिजित मुळ्ये**

abhijit.mulye@gmail.com

विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण व आरोग्य क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत पत्रकार.

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004